प्रकरण तिसरे

ठेवी व गुंतवणूक रचना

प्रकरण – ३

ठेवी व गुंतवणूक रचना

प्रस्तावना :

सहकारी संस्था अंतर्गत मार्गाने उभारलेले भांडवल अपुरे पडत असेल तर बाह्य मार्गाचा वापर करुन अधिक पैसा उभा करु शकते. त्यात ठेवी हा महत्वाचा मार्ग आहे. तसेच सहकारी संस्थांनी स्वीकारलेल्या ठेवी म्हणजे संस्थेची 'देणी ' असल्याने त्यांचा समावेश 'कर्जाऊ भांडवलात' करता येईल. ठेवी या सभासद व बिगर सभासद अशा दोन प्रकारच्या व्यक्तींकडून स्वीकारल्या जातात. मोठ्या आकाराच्या सहकारी संस्था सभासदांकडून सक्तीने काही ठेवी मिळवितात. तसेच ठेवीवर आकर्षक व्याज ठेवूनही सामान्य जनतेकडून ठेवी गोळा केल्या जातात. ठेवींची मुदत एक वर्षापासून तेरा वर्षापर्यंत किंवा त्याही पेक्षा अधिक असू शकते. तसेच, कोणतेही तारण न देता, कमी खर्चात भांडवल प्राप्त करण्याचा हा एक महत्वाचा मार्ग आहे. बँकेद्वारे घेतलेल्या कर्जापेक्षा ठेवीवरील व्याजदर कमी असतो.

३.१ कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेची ठेवींची रचना :

पतसंस्थेच्या नियमावली व उपविधीत नमुद केल्याप्रमाणे कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था पुढील प्रकारच्या ठेवी स्विकारते.

१) मुदत ठेव.

२) दामदुप्पट ठेव.

३) आवर्तीठेव.

४) कायम ठेव.

वरील प्रकारच्या ठेवी पतसंस्था गोळा करते. त्याचा मुख्य उद्देश भांडवल उभा करणे हा असला तरी सभासदांच्यामध्ये काटकसरीची तसेच बचतीची सवय लागते. सभासदांचा अनाठायी होणारा अनुत्पादक खर्च कमी होतो. सभासदांचा सहकारी चळवळीवरील विश्वास व श्रध्दा वाढून सहकारी चळवळ वाढीस लागते.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या ठेवी कशा वाढत गेल्या हे पुढील कोष्टकावरुन समजते.

कोष्टक क्रमांक ३:१

एकुण ठेवीतील वाढ.

अ.नं.	वर्षे	ठेवी (रुपये)	ठेवीतील वार्षिक वाढ (%)
१	१९७४-७५	उपलब्ध नाही.	
२	१९७५-७६	१७,४२५.००	-
३	१९७६-७७	१७,५२५.००	०.५७
४	१९७७-७८	१७,४२५.००	-०.५७
५	१९७८-७९	१७,२२५.००	-१.१४
६	१९७९-८०	१६,९२५.००	-१.७४
७	१९८०-८१	४३,१४५.००	१५५
८	१९८१-८२	१,०४,७००.००	१४३
९	१९८२-८३	१,७९,१००.००	७१
१०	१९८३-८४	२,२९,२८०.००	२८
११	१९८४-८५	२,३९,४७५.००	४.४
१२	१९८५-८६	२,६३,४४०.००	१०
१३	१९८६-८७	२,१३,७४०.००	-१९
१४	१९८७-८८	३,१८,४६०.००	४९
१५	१९८८-८९	५,६९,३७०.००	७९
१६	१९८९-९०	८,८७,०१३.००	५६
१७	१९९०-९१	११,८७,८२३.००	३४
१८	१९९१-९२	१६,३४,४२३.००	३८

आधार :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते सन १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

A
11856

प्रस्तुत कोष्टकात असे दिसून येते की, सन १९७६-७७ ते सन १९७९-८० या काळात एकुण ठेवी घटलेल्या आहेत. त्याचे प्रमुख कारण म्हणजे सदर कालावधीतील काही मुदत ठेवीची परतफेड करण्यात आली. तथापी सन १९८०-८१ साली सदर सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने ठेवीत वाढ आणण्याच्या दृष्टीने दामदुप्पट ठेवी आणि आवर्ती ठेवी या योजना कार्यान्वीत आणल्या. त्यामुळे त्यावर्षी ठेवीतील वाढ १५५ % आढळते.

सन १९८१-८२ साली दामदुप्पट या योजनेस अनुकूल प्रतिसाद लाभल्याने ठेवीची रक्कम वाढलेली आढळते. त्यामुळे सन १९८४-८५ अखेर सातत्याने ठेवीतील वाढ दिसून येते.

सन १९८५-८६ साली या पतसंस्थेने कायम ठेव योजना हाती घेतली. त्यामुळे ठेवीतील वाढ १०% नी आढळते. तथापी सन १९८६-८७ साली ठेवीमध्ये १९ % नी घट झालेली दिसते. याचे प्रमुख कारण म्हणजे या वर्षी मुदत ठेवी व आवर्ती ठेवीची परतफेड होय. कालांतराने १९९१-९२ अखेर ठेवीतील झालेली वाढ घटत्या दराने आहे. याचे कारण सुध्दा मुदत ठेव व आवर्तक ठेवीची परतफेड होय.

सन १९७५-७६ ते १९९१-९२ या वर्षा अखेरीस एकुण ठेवीतील वाढ ९२८० % आढळते. याचे कारण सभासदांनी संस्थेवरती दर्शविलेला विश्वास होय.

सन १९७५-७६ यावर्षी प्रति सभासद ठेव रुपये ८७.०० इतकी होती ती १९९१-९२ यावर्षी रुपये ४,१८०.०० इतकी झाली.

३:२ मुदत ठेवी :

कोणत्याही सहकारी पतसंस्था किंवा सहकारी बँका मुदत ठेवी या योजनेस प्राधान्य देतात. त्यामागे एका दृष्टीने संस्थेची वित्तीय स्थिती सुधारणे

हा हेतू असतो, आणि दुसऱ्या दृष्टीने ठेव धारकाकडून मुदतपुर्व कालावधीमध्ये सक्तीच्या बचतीचा अनुत्पादक कार्यासाठी विनियोग होवू नये शिवाय या ठेवी रुपाने सभासदांना जास्तीतजास्त लाभ मिळवून देणे हा होय.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने मुदत ठेवीची योजना सन १९७५-७६ पासून सुरु केलेली आहे. सन १९९१-९२ अखेर सदर मुदत ठेवीतील वाढ दर पुढील कोष्टकाच्या सहाय्याने दर्शविता येतो.

कोष्टक क्रमांक ३:२

मुदत ठेवी

अ.नं.	वर्षे	ठेवी (रुपये)	ठेवीतील वार्षिक वाढ (%)
१	१९७४-७५	उपलब्ध नाही.	
२	१९७५-७६	१७,४२५.००	-
३	१९७६-७७	१७,५२५.००	०.५७
४	१९७७-७८	१७,४२५.००	-०.५७
५	१९७८-७९	१७,२२५.००	-१.१४
६	१९७९-८०	१६,९२५.००	-१.७४
७	१९८०-८१	१६,८२५.००	-०.५९
८	१९८१-८२	४००.००	-९८
९	१९८२-८३	४००.००	०
१०	१९८३-८४	१०,५००.००	२५२५
११	१९८४-८५	२००.००	-९८
१२	१९८५-८६	१०,२००.००	९८
१३	१९८६-८७	२००.००	-९८
१४	१९८७-८८	१०,२००.००	९८
१५	१९८८-८९	१०,२००.००	०
१६	१९८९-९०	२१,१००.००	१०७
१७	१९९०-९१	११,१००.००	-४७
१८	१९९१-९२	१०,०००.००	-१०

आधार :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

सन १९७५-७६ ते १९८१-८२ आणि १९८४-८५, १९८६-८७,१९९०-९१ व १९९१-९२ या कालावधीत मुदत ठेवीच्या रक्कमेत घट घडून आलेली आदळते याचे कारण म्हणजे संबंधीत कालावधीत ठेवीची मुदत संपल्याने, सदर ठेवीची परतफेड करण्यात आली व ज्या प्रमाणात मुदत ठेवी परत कराव्या लागल्या तितक्या प्रमाणात नव्या मुदत ठेवी मिळाल्या नाहीत.

सन १९८२-८३ आणि १९८८-८९ या वर्षी मुदत ठेवीमध्ये काहीच वाढ घडून आलेली नाही. वस्तुतः पतसंस्थेच्या आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने, पतसंस्थेच्या संचालकांनी आणि पदाधिकाऱ्यांनी मुदत ठेवीमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने अधिक चिकाटीने प्रयत्न करावयास हवे होते.

सन १९८३-८४ या वर्षी मुदत ठेवीची रक्कम २५२५% नी वाढलेली आदळते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे पतसंस्थेने संबंधीत अवधीत ठेवीवरती आकर्षक दराने व्याज देणे, मुदतीनंतर ठेवी त्वरीत परत करणे, ठेवीदारांना अडीअडचणीच्यावेळी मुदतीपुर्व ठेवी परत करणेची हमी देणे आणि ठेवीमध्ये गुप्तता राखणे या बाबींना दिलेले प्राधान्य होय. परिणामी सन१९८५-८६, १९८७-८८ व १९८९-९० यावर्षी मुदत ठेवीमध्ये वाढ घडून आलेली आदळते.

सन १९७५-७६ या वर्षी प्रतिसभासद मुदत ठेव ८७.०० रुपये होती ती सन १९९१-९२ यावर्षी २६.०० रुपये झाली. एकूण पतसंस्थेच्या आर्थिक विकासामध्ये मुदत ठेवीचा महतम् विनियोग करणेत आला आहे. त्याचा निदर्शक म्हणजे पतसंस्थेची उलाढाल व प्रगती होय.

३ : ३ आवर्ती ठेवी :

आवर्ती ठेवी योजना पगारदार आणि सामान्य लोकांच्या दृष्टीकोनातून महत्वाची ठरते कारण या योजनेमुळे बचत करणेची सवय लागते शिवाय या खात्यावर दर महिन्यास ठराविक रक्कम ठेव म्हणून ठेवावीच लागते. ही

रक्कम पांच रुपये, दहा रुपये किंवा त्याचे पटीत भरावी लागते. या ठेवीची प्रमुख वैशिष्ठे म्हणजे सामान्य लोकांना बचतीची सवय लागते, ठेवीवरती व्याज व कर्ज मिळते. खात्याचे दुसऱ्या शाखेकडे स्थलांतर होते, ही ठेव कोणासही चालू करता येते. साधारणपणे महिन्याच्या शेवटच्या तारखेपुर्वी आवर्ती ठेवीची रक्कम भरावी लागते. आवर्ती ठेवीची मुदत जितकी जादा तितका व्याजाचा दर जादा. सदर पतसंस्थेने आवर्ती ठेवी सन १९८०-८१ पासून स्वीकारण्यास प्रारंभ केला. या बाबतीत जी प्रगती घडवून आणलेली आहे तिचा मागोवा पुढील कोष्टकाच्या सहाय्याने घेता येतो.

कोष्टक क्रमांक ३.३

आवर्ती ठेवी

अ.नं.	वर्षे	ठेवी (रुपये)	ठेवीतील वार्षिक वाढ (%)
१	१९८०-८१	२६,३२०.००	--
२	१९८१-८२	९३,३००.००	२५४
३	१९८२-८३	१,६७,७००.००	८०
४	१९८३-८४	२,०१,६८०.००	२०
५	१९८४-८५	२,२१,४७५.००	१०
६	१९८५-८६	२,२८,५२०.००	३
७	१९८६-८७	१,६२,०५०.००	-२९
८	१९८७-८८	१,७३,४००.००	७
९	१९८८-८९	२,२७,६२०.००	३१
१०	१९८९-९०	२,९०,८००.००	२८
११	१९९०-९१	३,३३,४१०.००	१५
१२	१९९१-९२	३,०६,७२०.००	- ८

आधार :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९८०-८१ ते सन १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

सन १९८६-८७ आणि सन १९९१-९२ यावर्षी आवर्ती ठेवीमध्ये अनुक्रमे २९% आणि ८ % घट झालेली दिसते. याचे कारण म्हणजे सदर वर्षी आवर्ती ठेवीची मुदत संपल्याने परतफेड करणेत आली.

सन १९८१-८२ आणि १९८२-८३ ही दोन वर्षे वगळता इतर वर्षी आवर्ती ठेवीची सरासरी वार्षिक वाढ १६.२८% इतकी आढळते. सन १९८२-८३ या वर्षी आवर्ती ठेवीत ८०% नी वाढ झालेली आहे. मात्र सन १९८१-८२ या वर्षी आवर्ती ठेवीत सर्वात जास्त म्हणजे २५४% वाढ झालेली दिसते. याचे कारण पतसंस्थेच्या संचालकाकडून व पदाधिकाऱ्यांकडून या योजनेत सभासदांनी गुंतवणूक करण्यास आवाहन केले व सभासदाकडूनही त्याला अनकुल प्रतिसाद मिळाला. पतसंस्थेच्या ठेवीदाराशी चर्चा केली असता त्यांनी आवर्ती योजनेची महत्ती मान्य केली. शिवाय या आवर्ती ठेवी मुदतीनंतर मिळणाऱ्या रक्कमेचा विनियोग अडचणीच्या गरजा भागविण्यासाठी केला जातो असा अभिप्राय व्यक्त केला.

सन १९८०-८१ या वर्षी प्रति सभासद आवर्ती ठेव ९६.०० रुपये होती ती सन १९९१-९२ या वर्षी ७८४.०० रुपये इतकी झाली.

३:४ दामदुप्पट ठेव योजना :

कोणतीही सहकारी पतसंस्था किंवा सहकारी बँक आर्थिक दृष्ट्या सक्षम बनण्यासाठी भांडवलाची नितांत गरज भासते. या दृष्टीकोनातून पतसंस्थेचे सन १९८१-८२ साली दामदुप्पट योजना जाहिर केली. या योजनेतुन पुढील लाभ मिळतात -

अ) पतसंस्थेची उलाढाल वाढते.

ब) ठेवीदारांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो.

क) ठेवीच्या तारणावरती अडीअडचणीतून सुटका करण्यासाठी कर्ज उपलब्ध होते.

ड) अनपेक्षित स्वरुपाच्या आणि अपेक्षित स्वरुपाच्या आर्थिक आपत्तीतून सुटका करण्यासाठी सदर ठेवी उपयुक्त ठरतात.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने दामदुप्पट ठेव योजनांतर्गत जी प्रगती घडवून आणली आहे तिचा मागोवा पुढील कोष्टकाच्या सहाय्याने घेता येतो.

कोष्टक क्रमांक ३:४

दामदुप्पट ठेव योजना

अ.नं.	वर्षे	ठेवी (रुपये)	ठेवीतील वार्षिक वाढ (%)
१	१९८१-८२	११,०००.००	-
२	१९८२-८३	११,०००.००	०
३	१९८३-८४	१७,१००.००	५५
४	१९८४-८५	१७,८००.००	४
५	१९८५-८६	२२,७००.००	२८
६	१९८६-८७	३०,७००.००	३५
७	१९८७-८८	१७,७००.००	-४२
८	१९८८-८९	४९,२५०.००	१७८
९	१९८९-९०	५६,९८३.००	१६
१०	१९९०-९१	१,२४,५३३.००	११९
११	१९९१-९२	२,७४,५३३.००	१२०

आधार :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९८१-८२ ते सन १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

सन १९८७-८८ या वर्षी दामदुप्पट योजनेंतर्गत ठेवीची रक्कम ४२% नी घटलेली आढळते याचे कारण संबंधित वर्षी पुर्ववत दामदुप्पट ठेवीची मुदत संपलेली असल्याने सदर ठेवीची परत फेड करण्यात आली.

सन १९८४-८५ आणि १९८९-९० या वर्षी अनुक्रमे दामदुप्पट योजनांतर्गत ठेवीत ४% आणि १६% वाढ झालेली आहे. तसेच सन १९८३-८४, १९८५-८६ आणि सन १९८६-८७ या वर्षी दामदुप्पट ठेव योजनांतर्गत सरासरी वार्षिक वाढीचा दर ३९.३३% इतका आहे. मात्र सन १९९०-९१ आणि १९९१-९२ यावर्षी संस्थेच्या सभासदाकडून सदर उपक्रमास उत्तम प्रतिसाद मिळाल्याने ठेवीमधील वाढीचा दर अनुक्रमे ११९% आणि १२०% इतका झाला.

सन १९८१-८२ या वर्षी प्रति सभासद दामदुप्पट ठेव ३९.०० रुपये होती ती सन १९९१-९२ या वर्षी रुपये ७०२.०० इतकी झाली.

३:५ कायम ठेवी :

सहकारी पतसंस्था अगर बँका दूरगामी दृष्टीकोनातून आर्थिक दृष्ट्या सबल होण्यासाठी आणि सभासदाचा सातत्याने संपर्क वाढीस लागण्यासाठी कायम ठेवींना महत्व लाभते. कायम ठेवी आणि कर्जाऊ रक्कम यामध्ये सहबंध आढळतो. पतसंस्थेच्या विधी व उपविधीनुसार सभासदाची भाग-भांडवलाची ५०००.०० रुपयांची मर्यादा ओलांडल्यानंतर मासिक वर्गणी ५०.०० रुपये आणि कर्जाऊ रक्कमेवरील ५% इतकी रक्कम कायम ठेवीत जमा होते. सदर ठेवीवरती सध्या (१९९१-९२) १६% व्याज अदा केले आहे. पतसंस्थेच्या कायम ठेवीचा आढावा घेण्यासाठी पुढील कोष्टक मार्गदर्शक ठरते.

कोष्टक क्रमांक ३:५

कायम ठेवी

अ.नं.	वर्षे	ठेवी (रुपये)	ठेवीतील वार्षिक वाद (%)
१	१९८५-८६	२,०२०.००	-
२	१९८६-८७	२०,७९०.००	९२९
३	१९८७-८८	१,१७,१६०.००	४६४
४	१९८८-८९	२,८२,३००.००	१४१
५	१९८९-९०	५,१८,१३०.००	८४
६	१९९०-९१	७,१८,७८०.००	३९
७	१९९१-९२	१०,४३,१७०.००	४५

आधार :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९८५-८६ ते सन १९९१-९२ अखेरचे वार्षिक अहवाल.

सन १९८६-८७ या वर्षी कायम ठेवीतील वाद ९२९% इतकी आढळते. त्याचे प्रमुख कारण म्हणे गतवर्षी (१९८५-८६) सभासदांनी कर्जाऊ रक्कमेस मागणी जादा केल्याने बहुसंख्य सभासदांनी भागाची ५,०००.०० रुपयांची कमाल मर्यादा ओलांडली त्यामुळे मासिक वर्गणी रुपये ५०.०० प्रत्येकी आणि कर्जाऊ रक्कमेची ५% कायमची ठेव कायम ठेवीत जमा झाली.

सन १९८७-८८ पासून कायम ठेवीमधील रक्कमेत लक्षणीय वाढ आढळते. मात्र ठेवीतील वार्षिक वाढीचा दर क्रमाक्रमाने घटत आहे. त्याचे कारण सभासद संख्येमध्ये अल्प गतीने वाढ झाली. तसेच ठेवीचा वापर कर्ज देण्यासाठी केल्याने आणि कर्जाऊ रक्कमेची परतफेड लवकर न झाल्याने कायम ठेवीत घट आढळते.

सन १९८५-८६ या वर्षी प्रति सभासद कायम ठेव ६.३० रुपये होती ती सन १९९१-९२ या वर्षी २,६६८.०० रुपये इतकी झाली. म्हणजेच एकूण आर्थिक उलाढालीत कायम ठेवीमध्ये अपेक्षीत वाढ आढळते.

३ : ६ गुंतवणूक रचना :

सहकारी पतसंस्था व बँकांना भांडवल गुंतवणूक करीत असताना सुरक्षितता, रोखता, लाभता आणि धोक्याचे विविधीकरण या मार्गदर्शक तत्वांचा आधार घ्यावा लागतो. पतसंस्थेकडील एकूण भांडवलापैकी रोख पैशाच्या किंवा द्रवरुप जिंदगीत किती पैसा ठेवावयाचा हे किमान रोखतेच्या कायदेशीर तरतुदी, नाणे बाजारातील परिस्थिती व रोख रक्कमेची दैनंदिन मागणी या घटकानुसार निश्चीत केली जाते. कोणत्याही पतसंस्थेने भांडवल दिर्घकालीन व लाभप्रत गुंतवणूकीसाठी कर्जवाटपासाठी, प्राथमिक स्वरुपात, कायम स्वरुपाच्या मालमत्तेत गुंतवणूक करावी अशी धारणा असते. कारण हीच दिर्घकालीन गुंतवणूक लाभप्रत ठरते आणि पतसंस्थेचे उत्पन्न वाढते.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने भांडवल गुंतवणूक करताना सहकारी संस्थांतर्गत परस्पर सहाय्य या सहकाराच्या प्राथमिक तत्वाची जोपासना केली आहे आणि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत व राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लि., राजारामनगर या संस्थांत भांडवल गुंतवणूक केली आहे. तसेच राष्ट्रवादाच्या कर्तव्याची जोपासना करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय बचत योजनेत गुंतवणूक केलेली आहे. या संबंधीच्या प्रगतीचा आढावा पुढील कोष्टकाच्या सहाय्याने घेता येतो.

कोष्टक क्रमांक २ : ६

गुंतवणूक रचना

अ.नं.	वर्षे	नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट (रुपये)	शेअर्स, सांगली जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., सांगली (रुपये)	शेअर्स, राजारामबापू पाटील सह. साखर कार. लि, राजारामनगर (रुपये)	कायम ठेव (रिझर्व्ह फंड) (रुपये)	एकूण गुंतवणूक (रुपये)
१.	१९७५-७६	–	–	उपलब्ध नाही –	–	–
२.	१९७६-७७	–	३,५००.००	–	–	३,५००.००
३.	१९७७-७८	–	३,५००.००	१,०००.००	३,५००.००	८,०००.००
४.	१९७८-७९	–	५,०००.००	१,०००.००	७,०००.००	१३,०००.००
५.	१९७९-८०	–	५,०००.००	१,०००.००	१२,५००.००	१८,५००.००
६.	१९८०-८१	१,०००.००	११,५००.००	१,०००.००	२०,५००.००	३४,०००.००
७.	१९८१-८२	१,०००.००	११,५००.००	१,०००.००	उपलब्ध नाही	१३,५००.००
८.	१९८२-८३	१,०००.००	२५,०००.००	१,०००.००	४८,५००.००	७५,५००.००
९.	१९८३-८४	१,०००.००	२५,०००.००	१,०००.००	५६,०००.००	८३,०००.००
१०.	१९८४-८५	१,०००.००	२५,०००.००	१,०००.००	७८,०००.००	१,०५,०००.००
११.	१९८५-८६	१,०००.००	२५,०००.००	१,०००.००	१,०५,०००.००	१,३२,०००.००
१२.	१९८६-८७	१,०००.००	७५,०००.००	१,०००.००	१,४१,५००.००	२,१८,५००.००
१३.	१९८७-८८	–	१,२५,०००.००	१,०००.००	१,८२,०००.००	३,०८,०००.००
१४.	१९८८-८९	५,०००.००	१,२५,०००.००	२,०००.००	२,२४,०००.००	३,५६,०००.००
१५.	१९८९-९०	५,०००.००	१,२५,०००.००	२,०००.००	२,९५,१८५.००	४,२७,१८५.००
१६.	१९९०-९१	५,०००.००	१,२५,०००.००	२,०००.००	३,४१,५००.००	४,७३,५००.००
१७.	१९९१-९२	५,०००.००	१,२५,०००.००	२,०००.००	४,१३,७००.००	५,४५,७००.००

आधार :
कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या ताळेबंद पत्रका आधारे असे आढळते की, सन १९७६-७७ ते १९७९-८० अखेर नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटमध्ये संस्थेने अजिबात गुंतवणूक केलेली नाही. मात्र सन १९८०-८१ या वर्षी १,०००.०० रुपये गुंतवणूक केली आहे. ती सन १९८६-८७ अखेर स्थिर आहे. म्हणजेच संस्थेने या कालावधीत गुंतवणूक वाढविलेली नाही. १९८७-८८ या वर्षीही संस्थेने नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट मध्ये गुंतवणूक केली नाही. सन १९८८-८९ ते १९९१-९२ अखेरसुध्दा नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेटमध्ये केलेली गुंतवणूक स्थिरच आहे. गुंतवणूकीत वाढ झालेली नाही.

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेअर्समधील गुंतवणूकी-मध्ये प्रतिवर्षी वार्षिक वाढीचा दर सरासरी एक ते तीन पटीने वाढलेला आढळतो. मात्र राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लि., राजारामनगर च्या शेअर्समध्ये सन १९७७-७८ ते सन १९९१-९२ अखेर (१९८८-८९ वगळता) केलेली गुंतवणूक स्थिरच आढळते.

कायम ठेव, रिझर्व्ह फंडाच्या बाबतीत सन १९८१-८२ आणि सन १९८२-८३ ही वर्षे वगळता प्रत्येक वर्षी १.१५ ते २ पटीने गुंतवणूक वाढ आढळते. एकुण गुंतवणूक रचनेबाबत सुध्दा गुंतवणूक वाढ ०.३९ ते ५.६० पटीने आढळते. पतसंस्थेच्या आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने विविध क्षेत्रात केली गेलेली भांडवल गुंतवणूक आर्थिक व फायदेशीर ठरणार आहे.